आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)

बुधवार, दिनांक : २८ ऑगस्ट, २०२४

ठळक बातम्या

1. प्रधानमंत्री जन धन योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीचं एक दशक पूर्ण; ६६ टक्क्यांहून अधिक जनधन खाती ग्रामीण आणि निमशहरी भागांत.
2. राष्ट्रीय औद्योगिक कॉरिडॉर विकास कार्यक्रमांतर्गत बारा नव्या ग्रीनफील्ड औद्योगिक स्मार्ट सिटींना केंद्रीय मंत्रिमंडळाची आज मंजुरी.
3. **234** नवीन शहरांमध्ये **730** रेडिओ चॅनेल साठी ई-लिलावाच्या प्रस्तावाला केंद्राची मान्यता; महाराष्ट्राला मिळणार अकरा नवीन एफ एम रेडिओ स्टेशन.
4. गडचिरोली जिल्हयातील आदिवासीबहुल जाजावंडी इथल्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील शिक्षक मंतय्या बेडके यांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार जाहीर.

**#####**

जन धन योजना

आज जनधन योजनेचा **10** वा वर्धापन दिन आहे. आर्थिक समावेशनाच्या प्रक्रियेवर या योजनेचा सकारात्मक प्रभाव पडला आहे. पंतप्रधानांनी या योजनेच्या दशकपूर्ती निमित्त सर्व लाभार्थ्यांचं अभिनंदन केलं, तसेच ही योजना यशस्वी करण्यात सहभागी असलेल्या प्रत्येकाचे आभार मानले आहेत. आर्थिक समावेशनाला चालना देण्यात तसेच कोट्यवधी लोकांना, विशेषत: महिला, युवा आणि उपेक्षित समुदायांना सन्मान मिळवून देण्यात जनधन योजना सर्वाधिक महत्वाची असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. " या उपक्रमांतर्गत **53** कोटी लोकांची जन धन खाती उघडण्यात आली असून हे या योजनेचं यश आहे," असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिलेल्या संदेशात म्हटलं आहे. या बँक खात्यांच्या माध्यमातून **2.3** लाख कोटींची रकम जमा झाली असून **36** कोटींपेक्षा जास्त विनामूल्य रूपे कार्ड जारी करण्यात आली आहेत, जी **2** लाख रुपयांचा अपघात विमा प्रदान करतात, असं देखील सीतारामन यांनी सांगितलं. बँकिंग सुविधेच्या कक्षेत नसणाऱ्या ग्राहकांना त्यांना बँक खाते, अल्प बचत योजना, विमा आणि कर्ज यांसह सार्वत्रिक, किफायतशीर,आणि औपचारिक वित्तीय सेवा पुरवून पीएम जनधन योजनेने गेल्या दशकभरात देशातील बँकिंग आणि वित्तीय परिदृश्यात परिवर्तन घडवलं आहे, असं प्रतिपादन अर्थमंत्री सीनतारामंन यांनी केलं.

प्रधानमंत्री जनधन खात्यांची **14** ऑगस्ट **24** रोजी एकूण संख्या : **53.13** कोटी इतकी असून त्यापैकी **29.56** कोटी जन-धन खातेधारक या महिला आहेत तसंच एकूण खात्यांपैकी तब्बल **66.6%** जनधन खाती ग्रामीण आणि निमशहरी भागांत आहेत.

**#####**

मंत्रिमंडळ निर्णय

राष्ट्रीय औद्योगिक कॉरिडॉर विकास कार्यक्रमांतर्गत , बारा नव्या ग्रीनफील्ड औद्योगिक स्मार्ट सिटींना केंद्रीय मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांन नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलताना ही माहिती दिली. यासाठी अंदाजे २८ हजार ६०२ कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार असून यात दहा लाख थेट आणि तीस लाख अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होईल, असं वैष्णव म्हणाले. हे प्रकल्प महाराष्ट्र, तेलंगणा, पंजाब, बिहार, उत्तराखंड, आंध्र प्रदेश, केरळ, राजस्थान आणि उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये राबवले जाणार आहेत. त्याचप्रमाणे आर्थिक व्यवहार मंत्रिमंडळ समितीनं दोन नवे रेल्वे मार्ग आणि एका मल्टी ट्रॅकिंग प्रकल्पासाठी ६ हजार ४५६ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे. या नवीन प्रकल्पांमुळे एक हजार तीनशे खेडी जोडली जाणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**#####**

कृषी पायाभूत सुविधा निधी’

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने आज ‘कृषी पायाभूत सुविधा निधी’ अंतर्गत वित्तपुरवठा सुविधेच्या केंद्रीय क्षेत्र योजनेच्या क्रमशः विस्ताराला मंजुरी दिली आहे, ज्यामुळे ती अधिक आकर्षक, प्रभावशाली आणि सर्वसमावेशक होईल.

देशातील कृषी पायाभूत सुविधा वाढवून त्यांच्या बळकटीकरणाकरिता तसेच शेतकरी समुदायाला पाठबळ देण्याकरिता, सरकारने कृषी पायाभूत सुविधा निधी (एआयएफ) योजनेची व्याप्ती वाढवण्यासाठी अनेक उपाययोजनांची घोषणा केली आहे. पात्र प्रकल्पांच्या व्याप्तीचा विस्तार करून मजबूत कृषी पायाभूत सुविधा परिसंस्थेला चालना देण्यासाठी अतिरिक्त सहाय्यक उपायांची मोट बांधणे हा या उपक्रमांचा उद्देश आहे. स्वयंनिर्वाही कृषी मालमत्ता, एकात्मिक प्रक्रिया प्रकल्प, पीएम कुसुम घटक-अ, नॅब संरक्षण आदी घटकाना या अंतर्गत प्रोत्साहन दिले जाईल ज्यामुळे कृषी पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये अधिक गुंतवणूकीला प्रोत्साहन मिळेल.

**#####**

एफ एम ऑक्शन

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने आज खाजगी **FM** रेडिओ फेज ३ अंतर्गत **234** नवीन शहरांमध्ये **730** रेडिओ चॅनेल साठी ई-लिलावाच्या प्रस्तावाला मान्यता दिली असून, यात अंदाजे **784.87** कोटी इतकी रकम जमा होण्याची शक्यता आहे. या अंतर्गत महाराष्ट्राला अकरा नवीन एफ एम रेडिओ स्टेशन मिळणार आहे.

वस्तू आणि सेवा कर वगळून एकूण महसुलाच्या **4% FM** चॅनेलचे वार्षिक परवाना शुल्क आकारण्याच्या प्रस्तावालाही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. नव्या रेडिओ स्थानकांमुळे रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील तसंच स्थानिक बोली आणि संस्कृतीला चालना मिळेल. याद्वारे 'व्होकल फॉर लोकल' उपक्रमाला अधिक बळकटी मिळेल असं जारी पत्रकात कळवण्यात आलं आहे. केंद्र शासनाने मंजुरी दिलेल्या २३४ नवीन शहरांपैकी अनेक भाग हे आकांक्षीत जिल्हयांत आणि नक्षल प्रभावित क्षेत्रांत येत असल्याने या भागात खाजगी एफएम रेडिओची स्थापना सरकारी योजनांची व्याप्ती अधिक मजबूत करेल. यात अचलपूर, बार्शी, चंद्रपूर, गोंदिया, लातूर, मालेगाव, नंदूरबार, उस्मानाबाद, उदगीर, वर्धा, यवतमाळ या जिल्हयांचा समावेश आहे.

**#####**

राष्ट्रीय कृती दलाची दुसरी बैठक

एनटीएफ अर्थात राष्ट्रीय कृती दलाची दुसरी बैठक आज नवी दिल्लीत झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय गृह सचिव आणि केंद्रीय आरोग्य सचिव होते, तर सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालक बैठकीत दूरदृष्यप्रणाली मार्फत सहभागी झाले. वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसंबंधी तात्काळ करण्याच्या उपाययोजनांवर चर्चा झाली. केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं **'Suggestions to NTF'** नावाचं पोर्टल तयार केलं असून त्यावर सूचना मागवल्या आहेत.

**#####**

निवृत्ती वेतन

केंद्र सरकारने २४ ऑगस्ट रोजी 'एकीकृत निवृत्तिवेतन योजना' अर्थात युपीएसची घोषणा केली. त्याच धर्तीवर महाराष्ट्रात आता युपीएस जशीच्या तशी लागू करण्यात येणार आहे. यामुळे येणाऱ्या अतिरिक्त खर्चास मान्यता देण्यात येत असल्याचं वित्त विभागानं कळविलं आहे.

#####

माविआ आंदोलन

मालवण मधील  राजकोट किल्ल्यातला छत्रपती शिवाजी महारांजाचा पुतळा कोसळणं ही घटना संतापजनक आहे. या घटनेचा निषेध करण्यासाठी  महाराजांचा घोर अपमान करणाऱ्या युती सरकार विरोधात, महाविकास आघाडी रविवार दिनांक  १ सप्टेंबर रोजी मुंबईत आंदोलन करणार आहे. सकाळी हुतात्मा चौकापासून गेट वे ऑफ इंडियापर्यंत मोर्चा काढून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर आंदोलन केलं  जाणार आहे. तर २ सप्टेंबरपासून संपूर्ण राज्यात जिल्हा आणि  तालुक्यातही हे आंदोलन करण्याचा निर्णय महाविकास आघाडीच्या वरिष्ठ नेत्यांच्या बैठकीत घेण्यात आला असल्याचं, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितलं.

शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष  शरद पवार, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची मातोश्रीवर आज  बैठक झाली. या बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना पटोले यांनी ही माहिती दिली.

दरम्यान, मालवण राजकोट इथं कोसळलेल्या पुतळ्याची पाहणी करण्यासाठी आज तिथं गेलेले शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे आणि भाजप नेते नारायण राणे यांच्या समर्थकांनी एकमेकांवर दगडफेक केली. यात एक पोलीस आणि एक महिला असे दोघे जखमी झाले. आज महाविकास आघाडीनं मालवण बंदची हाक दिली होती, त्याला मालवण मध्ये शंभर टक्के प्रतिसाद मिळाला. मालवणची पूर्ण बाजारपेठ आज बंद होती. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली. पण मालवणमध्ये तणावपूर्ण वातावरण असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

#####

पुतळा / फडणवीस

मालवण येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा पडल्याच्या घटनेला विरोधकांनी निवडणुकीच्या चष्म्यातून न पाहता यावर राजकारण करणे थांबवले पाहिजे .हा पुतळा नौदलाने बांधला होता. राज्य सरकारने नाही .तरीसुद्धा या घटनेची चौकशी, दोषींवर कारवाई आणि भव्य पुतळ्याची उभारणी या तीनही पातळीवर राज्य सरकार काम करत असल्याचे स्पष्टीकरण, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर येथे प्रसार माध्यमांशी बोलताना दिलं.

#####

राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार

केंद्र सरकारच्या वतीनं दिल्या जाणाऱ्या राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारांची काल घोषणा करण्यात आली. यंदा देशभरातील ५० शिक्षकांना या पुरस्कारांनं सन्मानित करण्यात येणार आहे; यात महाराष्ट्रातल्या दोन शिक्षकांचा समावेश आहे. गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्यातील आदिवासीबहुल जाजावंडी इथल्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील शिक्षक मंतय्या बेडके; तसंच कोल्हापुरातील स. म. लोहिया माध्यमिक शाळेतील कलाशिक्षक सागर बगाडे यांना यंदाचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या पाच सप्टेंबर रोजी नवी दिल्लीत हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील. रजत पदक आणि ५० हजार रोख असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. मंतय्या बेडके यांनी आकाशवाणीशी बोलतांना या पुरस्कारामागील पार्श्वभूमी स्पष्ट केली.

*जिल्हा परिषद उच्च प्राथमिक डिजिटल शाळा ही अतिशय दुगम भागात अतिशय संवेदनशील नक्षलग्रस्त भागात आहे. जेव्हा मी या शाळेत आलो ही शाळा बंद होण्याच्या स्थितीत होती आणि या शाळेची पटसंख्या फक्त सात इतकी होती. सर्वप्रथम मी या शाळेच्या रंगरंगोटिला या बिल्डिंगला मंदिराप्रमाणे आकार दिला. तेव्हा विद्यार्थी आणि पालकांच्या मनात शिक्षणाविषयी गोडी निर्माण झाली आणि विद्यार्थी हळूहळू शाळेकडे आकर्षित झाले. कला, क्रीडा आणि विविध क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांच्या विकासासाठी विविध असे नव उपक्रम मी या शाळेत राबवले आहे त्यामुळे पटसंख्या एक वरुन एकशे अडतीस झालेली आहे. क्रीडा क्षेत्रामध्ये सुद्धा माझे विद्यार्थी चैम्पियंन आहेत. या सर्व बाबींचा विचार करून केंद्र सरकारने राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार मला देण्याचा विचार केला त्याबद्दल मी केंद्र सरकारचे धन्यवाद व्यक्त करतो आहे.*

**#####**